जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2024
पुढारी

# देश विकासात सर्वांचे योगदान गरजेचे : प्र. कुलगुरू डॉ. पाटील

गडहिंग्लज : भारत हा विकसनशील प्रवाहातील देश आहे. २०४७ पर्यंत विकसित होण्याचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. त्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. येथील शिवराज विद्या संकुल व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'कॉम्प्युटर सायन्स व इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रास प्रारंभ झाला. याप्रसंगी बीजभाषक म्हणून ते बोलत होते. शिवराज संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे हे अध्यक्षस्थानी होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने चर्चासत्राचा प्रारंभ झाला. प्रा. रवी खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी पाहुणे परिचय करून दिला. डॉ. पाटील म्हणाले, देशात नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. यातून विविध संधी खुल्या होत असून, विद्यार्थ्यांनी लाभ घ्यायला हवा. शिवराज महाविद्यालयाला नॅकची 'अ' श्रेणी मिळाल्याबद्दल कौतुक केले. शिवराजचे सचिव डॉ. अनिल कुराडे व प्रा. कुराडे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. संस्थेचे उपाध्यक्ष जे. वाय. बारदेस्कर, ॲड. दिग्विजय कुराडे, बेळगाव विद्यापीठाचे डॉ. एस. एस. गोरनाले, प्रा. बिनादेवी कुराडे, डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. किशोर आदाटे व प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. रोमा फर्नांडिस यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आर. के. पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2024
लोकमत

# सेवालाल महाराज जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात झाली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात संत सेवालाल महाराज यांची जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरूवारी संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ.श्रीकृष्ण महाजन, डॉ.महादेव देशमुख, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.प्रतिमा पवार यांच्यासह शिक्षक आणि प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2024
पुढारी

# संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांच्यासह शिक्षक आणि प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2024
पुढारी

# विद्यापीठात आज मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्राम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या वतीने शुक्रवार (दि.१६) तिसरा मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित करण्यात आला आहे. यावर्षीच्या प्रोग्रामची थीम : 'ऑन वेस्ट टू हेल्थ अँड आर्टिफिशियल इंटेलिजन्स : सस्टेनेबल प्रॅक्टिस फॉर क्लायमेट ॲक्शन'ही आहे.

कार्यक्रमात विविध कंपन्यांबरोबरच काही संशोधन संस्थांमधील शास्त्रज्ञांचे सहा व्याख्याने होणार आहेत. पालापाचोळ्यांच्या कचऱ्यापासून विविध पॅकेजिंग मटेरियल व इतर जैविक कचऱ्यापासून बायो सीएनजीची निर्मिती व परिणामी पर्यावरणाचे संतुलनसारख्या विविध विषयांवर चर्चा होणार आहे. कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. के. के. शर्मा यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2024
लोकमत

# विद्यापीठात आज मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्राम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड ,बायोटेक्नॉलॉजीच्यावतीने आज, शुक्रवारी ३ रा मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित करण्यात आला आहे.

या प्रोग्राममध्ये विविध कंपन्यांबरोबरच काही संशोधन संस्थांमधील शास्त्रज्ञांची व्याख्याने होणार आहेत. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. के. के. शर्मा यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या भूमीकेचे स्वागत

**कोल्हापूर :** कोल्हापूरच्या खेळाडूंनी विविध खेळांमध्ये जगभर आपला दबदबा निर्माण केला. या विविध क्रीडा प्रकारांना चालना देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने सकारात्मक पाऊल उचलले आहे. यंदाच्या अंदाजपत्रकात खेळा संबंधिच्या विविध घटकांना भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे विद्यापीठाने खेळांसाठी केलेल्या या तरतूदींचे स्वागत क्रीडाक्षेत्रातून केले जात आहे.

विद्यापीठ प्रशासनाने केलेल्या तरतूदींमध्ये नेट बॉलसाठी ३ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. तर इनडोअर खेळांच्या विविध सोयी उपलब्ध व्हाव्यात, त्यासाठी ५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठातील खेळाची मैदाने सुस्थितीत राहावीत, यासाठी घसारा निधीतून ४२ लाखांची तरतूद केली आहे. प्रशासनाच्या वतीने विविध स्पर्धा, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरे यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय उपचारासाठी १० लाखांची तरतूद केली आहे.त्यामुळे शासनाने विभागीय क्रीडा संकुलाचे व्यवस्थापनही विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकडे द्यायला हवे; तर त्याचा लाभ खेळाडूंना होईल, अशी भावना क्रीडा विश्वातून व्यक्त होत आहे.

### ही कामे प्रगतीपथावर...

क्रीडा विभागासाठी भरघोस तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर अनेक कामांना सुरुवात करण्यात आली आहे, तसेच क्रीडाविभाग वसतीगृहाकरीता ३ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कुस्ती संकुलासाठीही ५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे, या संकुलाचे काम प्रगतीपथावर आहे.

16 FEB 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात एरोजेल संशोधन

## डॉ. व्ही. जी. पारळे; भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे व्याख्यान



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित व्याख्यानावेळी डॉ. व्ही. जी. पारळे आणि व्ही. डी. फडतरे यांचा प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या हस्ते करण्यात आला.

कोल्हापूर, ता. १५ : देशात डॉ. ए. व्ही. राव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमतः शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये एरोजेल पदार्थाच्या संशोधनाची सुरुवात झाली. ते संशोधन आपले जीवन अधिक सुखकर करेल, असे प्रतिपादन दक्षिण कोरियातील योन्साय विद्यापीठातील संशोधक प्राध्यापक डॉ. व्ही. जी. पारळे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातर्फे आयोजित 'एरोजेलमधील नवीन संशोधन' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे होते. डॉ. पारळे यांनी एरोजेल पदार्थाचा रंजक इतिहास, त्यांच्या उपयोगांची माहिती दिली. भाभा अणुविज्ञान केंद्रासाठी लागणारे एरोजेल पदार्थ भौतिकशास्त्र अधिविभागातील संशोधक डॉ. वाघ, डॉ. हरनाथ यांनी डॉ. राव यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केल्याचे सांगितले. विद्यार्थीनी मूलभूत संशोधनाकडे वळावे, असे आवाहन प्रा. सोनकवडे यांनी केले. डॉ. व्ही. डी. फडतरे, ए. व्ही. मोहोळकर, एम. व्ही. टाकळे, यु. एम. चौगुले, ए. आर. पाटील, एस. एस. पाटील उपस्थित होते. डॉ. के. वाय. राजपुरे यांनी आभार मानले.

16 FEB 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठीला समृद्ध करण्यासाठी नवीन शब्दांचा वापर करा

## डॉ. दीक्षित : प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : सध्या आपण मराठीला अधिक समृद्ध करण्यासाठी जास्तीत जास्त नवीन शब्दांचा वापर करावा. भाषेचा अभिमान बाळगण्यासह आपण भाषेसाठी काहीतरी देणे लागतो, याचा विचारही तरुण पिढीने करावा, असे प्रतिपादन प्रा. डॉ. राजा दीक्षित यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे आयोजित प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे होते. प्रा. दीक्षित यांनी 'मराठी लढ्याचे शतक' या विषयाची मांडणी करताना मराठी भाषेच्या विकासाचे आणि समृद्धीचे एकूण पाच टप्पे सांगितले. यात पहिला टप्पा संत चळवळ (१३ ते १६ वे शतक), दुसरा टप्पा मराठा काळ (१६३० ते १८१८), तिसरा टप्पा प्रबोधन काळ (१९ वे शतक), चौथा टप्पा (संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि महाराष्ट्र निर्मितीचा काळ), पाचवा टप्पा हा जागतिकीकरणानंतरचा काळ या टप्प्यांच्या आधारे त्यांनी मराठी भाषेच्या विकासाचा आणि त्यात आलेल्या संकटांचा आढावा घेतला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी इतिहास विभागातर्फे आयोजित व्याख्यानात बोलताना राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजा दीक्षित. शेजारी डॉ. अरुण भोसले, नंदकुमार मोरे, डॉ. अवनिश पाटील.

प्रा. मोरे यांनी मराठी भाषेच्या उत्कर्षामध्ये संत तुकारामांचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. डॉ. अरुण भोसले, अशोक चौसाळकर, किशोर बेडकिहाळ, विलास पोवार, इस्माईल पठाण, दशरथ पारेकर उपस्थित होते. डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. उमाकांत हत्तीकट यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात २१ पासून योग, निसर्गोपचार परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने दि. २१ ते २२ फेब्रुवारीदरम्यान राष्ट्रीय स्तर योग व निसर्गोपचार परिषदेचे मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात आयोजन केले आहे. 'योग व निसर्गोपचाराचे नवे आयाम' हा विषय आहे. देशभरातील विविध तज्ज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने होणार आहेत. योग, निसर्गोपचार, अक्युप्रेशर, आहार अशा विविध विषयांवरील शोधनिबंधांचे सादरीकरण होणार आहे. योगाची विविध आसने व शुद्धीक्रियेचे सादरीकरण होणार आहे. २० फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2024
लोकमत

# बुधवारपासून राष्ट्रीय निसर्गोपचार परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तारविभागाच्यावतीने २१ ते २२ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीयस्तर योग व निसर्गोपचार परिषदेचे आयोजन केले आहे. मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात होणाऱ्या या परिषदेसाठी नोंदणी करण्याचे आवाहन विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनी केले. २० पर्यंत नोंदणीची मुदत आहे.

16 FEB 2024 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# महिलांचा हक्क लागावा... सार्थकी!

**इंग्लंडमध्ये महिलांना १८६५ पासून लढा द्यावा लागला. अनेकजण मृत्युमुखी पडल्या. अनेक महिला आणि समर्थक पुरुष अपंग झाले. त्यानंतर १९२८ साली मताधिकार मिळाला. याउलट भारतात फारसे आंदोलन न करता महिलांना मताधिकार मिळाला. पुढे भारतीय संविधानात स्त्री-पुरुष समानतेचे सूत्र मांडले. त्यामुळे १९४७ साली भारत स्वतंत्र होतानाच महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला; मात्र हे साध्य होण्यासाठी येथे वैचारिक मशागत अनेक वर्षांपासून झाली होती; मात्र महिलांना मताधिकार आणि निवडणूक लढवण्याचे स्वातंत्र्य याचा त्यांनी खऱ्या अर्थाने फायदा घ्यायला हवा. तरच खऱ्या अर्थाने मतोत्सवातील महिलांचा सहभाग सार्थकी लागेल.**



डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दुसऱ्या महायुद्धानंतर जग शांततेबाबत थोडे गंभीर झाले. त्यातून युनोची स्थापना झाली आणि पूर्वीच्या तुलनेत युद्धाचे प्रमाण आणि परिणाम घटले. दुसरीकडे सतराव्या शतकापासून विज्ञान संशोधनाला मोठी गती मिळाली. त्याचसोबत संशोधनाचे तंत्रज्ञानात रूपांतर करणे आणि त्यात अहर्निश सुधारणा करण्याकडे लोकांचा कल वाढला. भौतिक सुविधा आणि आरोग्यविषयक मोठे संशोधन झाले. यातून लोकसंख्येमध्ये मोठी वाढ होत राहिली. शांतता हवी, तर लोकांच्या मनाप्रमाणे कारभार चालला पाहिजे. समाजातील बहुमताला भावेल असे प्रशासन असणे गरजेचे बनेल, असे प्रशासन देण्यासाठी लोकांनीच सरकार बनवणे आवश्यक होते. त्यातून लोकशाहीची संकल्पना आली. आज जगातील बहुतांश राष्ट्रांमध्ये लोकशाही पद्धतीने निवडून आलेले प्रतिनिधी सरकार बनवतात आणि त्यांच्यामार्फत प्रशासन चालते.

भारतात ब्रिटिशराज आले आणि हिंद द्वीपकल्पात एकछत्री अंमल सुरू झाला. १९४७ साली ब्रिटिश सत्ता गेली. भारत स्वतंत्र झाला. त्यातून भारत, पाकिस्तान आणि बांग्लादेश असे तीन देश तयार झाले. त्यापूर्वीच ब्रह्मदेश, इंडोनेशिया, अफगाणिस्तानात स्वतंत्र राष्ट्र संकल्पना रुजली होती. भारत स्वतंत्र होताना भारताने लोकशाही संकल्पना १९४७ मध्ये स्वीकारली. या देशाचे संविधान तयार झाले. ते १९४९ मध्ये स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० रोजी भारत एक प्रजासत्ताक राष्ट्र बनले. त्यानुसार पुढे वाटचाल सुरू झाली. आपण प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून अमृतमहोत्सवी वर्षाच्या उंबरठ्यावर आहोत. त्यावेळी मतोत्सवाचा आढावा घेणे, त्यातील स्थित्यंतरे तपासणे, त्यावर चिंतन करणे आवश्यक आहे. एक लोकशाही राष्ट्र म्हणून हे आवश्यक आहे.

भारत लोकसंख्येबाबत जगातील दुसऱ्या क्रमांकावरील राष्ट्र. लोकशाही असलेले लोकसंख्येच्या दृष्टीने भारत जगातील सर्वात मोठे राष्ट्र. विविध भाषा, धर्म, पंथ, जाती यांनी ओतप्रोत भरलेले राष्ट्र. भारतात पुरुष आणि स्त्रिया दोहोंना मतदानाचा अधिकार आहे. जात, धर्म, लिंग भेदविरहित १८ वर्षांवरील कोणताही नागरिक मतदान करू शकतो. त्यातून जनप्रतिनिधी निवडले जातात. त्यांच्यातून मंत्री आणि पंतप्रधान ठरतात. पुढे हेच प्रतिनिधी राष्ट्रपती निवडतात आणि देशाचा कारभार चालवतात. भारतीय स्वातंत्र्याचा नुकताच अमृतमहोत्सव साजरा करण्यात आला. आता प्रजासत्ताकाचा अमृतमहोत्सव आहे. लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही. लोकशाहीमध्ये सरकारच्या कामाचे मूल्यमापन ठरावीक वर्षांनंतर करण्यात येते. भारतात दर पाच वर्षांनी, अमेरिकेत चार वर्षांनी एवढाच काय तो फरक. याप्रसंगी मतोत्सवावर चिंतन करताना या मतोत्सवात महिला कोठे आहेत. त्यांना मताचा अधिकार मिळाला याचा मोठा इतिहास आहे.

मताधिकार म्हणजे निवडणुकीत मतदानाचा अधिकार. सरकार किंवा जनप्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान करण्याचा, आपले मत नोंदवण्याचा अधिकार म्हणजे मताधिकार. अठराव्या शतकाच्या सुरुवातीस महिलांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी काही कायदे बनवण्यात आले. जगभरात लोकशाही व्यवस्था ज्या-ज्या राष्ट्रांनी स्वीकारली त्या-त्या राष्ट्रांमध्ये महिलांना मताधिकार सहज मिळाला नाही. महिलांना त्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. पाश्चात्त्य राष्ट्रांमध्ये अठराव्या शतकापासून लढा सुरू झाला.

दोन शतकांपूर्वी पुरुषांची स्त्रियांना मताधिकार देण्याविषयी अत्यंत टोकाची मते होती. युरोपमध्ये अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात लोकशाही व्यवस्था रुजू लागली. इंग्लंड याबाबत आघाडीवर होते; मात्र इंग्लंडमध्ये मताचा अधिकार संकुचित होता. सर्वच पुरुषांना मताचा अधिकार नव्हता. महिलांना मताचा अधिकार नसल्याचे सर्व राजकीय नेते एकसुरात बोलत असत. स्त्रिया मग त्या उच्चवर्गातील असोत किंवा कनिष्ठ त्यांना मताचा अधिकार नव्हता. १९ व्या शतकाच्या शेवटी महिलांना याची जाणीव होऊ लागली. त्याविरुद्ध त्यांनी आवाज उठवण्यास सुरुवात केली. या आंदोलनाला सफ्रेजेट आंदोलन म्हणून ओळखले जाते. इंग्लंडमध्ये यासाठी मताच्या अधिकारासाठी १८३२ मध्येच एक विधेयक सादर करण्यात आले होते; मात्र त्यामध्ये केवळ पुरुषांचा विचार करण्यात आला होता. जॉन स्टुअर्ट मिलने याबाबत जाहीर निषेध व्यक्त केला. इंग्लंडमध्ये सर्वप्रथम १८६५ मध्ये महिलांना मताधिकार मिळावा म्हणून आंदोलन सुरू झाले. हे आंदोलन मोठे व्यापक आणि तीव्र होते. मिल दाम्पत्य याविषयी लढा देत होते. पत्नीच्या निधनानंतर मिल एकटेच राहिले. मिल यांनी 'स्त्रियांची परवशता' हे पुस्तक लिहिले; मात्र याला खऱ्या अर्थाने संघटित स्वरूप जर्मनीमध्ये मिळाले. १९०४ साली इंटरनॅशनल वुमेन सफ्रेजेट अलायन्सची बर्लिन येथे स्थापना झाली. तसा तर १७७६ मध्ये न्यू जर्सी येथे महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला होता; मात्र तो सर्वांना मान्य नव्हता. यावर मोठी टीका झाली. त्यामुळे १८०६ मध्ये काढून घेण्यात आला. त्यानंतर मात्र महिलांना मोठा संघर्ष करून मताधिकार मिळवावा लागला. इंग्लंडमध्ये खऱ्या अर्थाने हा लढा लढला जात होता. १९०७ मध्ये संसदेवर मोर्चा काढण्यात आला. महिला आंदोलन चिरडण्याचा मोठा प्रयत्न झाला. आंदोलकांवर हल्ला करण्यात आला. त्यामध्ये अनेक महिला जखमी झाल्या. अनेकांची हाडे मोडली. अनेकजणी अपंग झाल्या. पुढील दोन वर्षांत अनेक आंदोलक महिलांना अटक करण्यात आली. तुरुंगात टाकण्यात आले. पुढे जवळपास एक तप आंदोलन तीव्र होत गेले. या आंदोलनाची घोषणा 'मत किंवा मृत्यू' अशी होती. अनेक महिलांनी आपले जीवन पणाला लावल्यानंतर २ जुलै १९२८ रोजी हा लढा यशस्वी झाला आणि महिलांना ब्रिटिश संसदेने मतदानाचा अधिकार दिला.

इंग्लंडमध्ये सुरू झालेला हा लढा त्यांचे राज्य असलेल्या सर्व वसाहतींमध्ये पसरला. सर्वत्र महिलांना मताचा अधिकार देण्याबाबत युरोप आणि अमेरिकेत व्यापक लढा उभारण्यात आला. दरम्यान, जॉन मिल याच मुद्द्यावर निवडणूक लढून ब्रिटिश संसदेत सदस्य म्हणून निवडून आला. त्याने तत्काळ यासाठी विधेयक सादर केले. १८६७ मध्ये मेल पर्सनऐवजी मॅन असा शब्द वापरून मताधिकार कायद्यात इंग्लंडमध्ये सुधारणा झाली. तरीही महिलांना मताधिकार देण्याबाबत वातावरण योग्य बनले नाही. स्त्रियांना मताधिकार देण्यासाठी वारंवार विधेयके मांडण्यात आली. १८७० मध्ये सर्व स्त्रियांना मताधिकार देण्याचे

▸▸ पान ८ वर

16 FEB 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांचा हक्क लागावा... सार्थकी!

▸▸ पान ४ वरून...

बिल मांडण्यात आले आणि ते फेटाळले गेले. 'राजकारणात स्त्रियांना हस्तक्षेप करू देणे म्हणजे असंयम आणि असहिष्णुता यांना आमंत्रण दिल्यासारखे आहे' असे सरकारचेच मत होते. सन १८७२ साली मांडण्यात आलेले विधेयक फेटाळल्यानंतर पुन्हा १८७४, १८७७, १८७९ आणि १८८४ साली विधेयके सादर झाली. अखेर या विधेयकांवर ॲटर्नी जनरल यांनीच प्रश्न उपस्थित केला की, 'पार्लमेंटमध्ये कायदा, व्यापार, उद्योग, सैन्य, युद्ध या प्रश्नांवर बोलू शकेल अशी कोणी महिला आहे काय, स्त्रियांना या क्षेत्रातील अनुभव आहे का?' यावर संपूर्ण सभागृहात नाही, नाही असा एकच आवाज झाला आणि विधेयक फेटाळले गेले. पुढे १८९४ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला.

पुढे १९०५ मध्ये केअर हार्डी यांनी महिला मताधिकार विधेयक सभागृहात सादर केले. हार्डीचा अत्यंत वाईट शब्दात सभागृहात अपमान करून हे विधेयकही नाकारण्यात आले. २५ एप्रिल १९०६ रोजी पुन्हा महिलांना मताधिकाराचा ठराव मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र पोलीस बळाचा वापर करून तो हाणून पाडण्यात आला. सभागृहाबाहेर मात्र निदर्शने चालूच राहिली. पुढे १३ फेब्रुवारी १९०७ रोजी इंग्लंडच्या संसदेवर मोर्चा नेण्यात आला. १९०७-०८ मध्ये साडेतीनशे स्त्रियांना तुरुंगवास भोगावा लागला. महिला जेथे मंत्री भाषण करणार असतील तेथे घोषणा देऊ लागल्या. अखेर मंत्र्यांनी सार्वजनिक कार्यक्रम बंद केले. स्त्रियांच्या आंदोलनाने सरकार पूर्ण गोंधळले होते. जेलमध्ये महिलांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले. वृत्तपत्रांनी याची चांगलीच दखल घेतली. स्त्रियांनी न्यायालयापुढे आणि न्यायालयातही आंदोलन सुरू केले. 'मत किंवा मृत्यू' या घोषणेने लोकांच्या मनावर गारुड केले. पहिल्या महायुद्धाच्या काळात हे आंदोलन थंडावले. ६ फेब्रुवारी १९१८ रोजी मर्यादित स्वरूपात मताधिकार देण्यात आला; मात्र याचा परिणाम अन्य देशातही झाला आणि जगातील अनेक देशांत महिलांना मतदानाचा अधिकार देण्याबाबत गांभीर्याने विचार सुरू झाला.

पाश्चात्त्य राष्ट्रांनी पहिल्या महायुद्धाच्या काळातच मताधिकार देण्यास सुरुवात केली. कॅनडामध्ये महिलांना मताधिकार १९१७ मध्ये इंग्लंडच्याही अगोदर प्रदान करण्यात आला. जर्मनीमध्ये १९१८, ऑस्ट्रिया आणि नेदरलँडमध्ये १९१९ मध्ये महिलांना मताधिकार देण्यात आला. अमेरिकेत मात्र त्यानंतर १९२० मध्ये मताधिकार देण्यात आला. या राष्ट्रांना महिलांचा युद्धात सहभाग, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहयोग हवा होता. त्यामुळेच हे साध्य झाले होते. युरोपमध्ये फ्रान्सने मात्र १९४४ पर्यंत महिलांना मताधिकारापासून वंचित ठेवले होते. १९३० पासून सुशिक्षित आणि धनवान महिलांना हा अधिकार देण्यात आला होता; मात्र सार्वत्रिक अधिकार नाकारण्यात आला होता.

त्याचवेळी भारतातील स्वातंत्र्य चळवळ जोरात होती. मार्गारेट कुझीन, ॲनी बेझंट या चळवळीत अग्रणी होत्या. इंग्लंडमधील स्त्रियांप्रमाणे भारतातील महिलांना मतदानाचा हक्क मिळाला पाहिजे, याबाबत त्या आग्रही होत्या. यासाठी सरोजिनी नायडू या १४ अन्य महिलांना घेऊन व्हॉईसरॉय यांना भेटण्यास गेल्या. रमाबाई रानडे, राणी लक्ष्मीबाई राजवाडे या महाराष्ट्रातील महिलांचा यात समावेश होता. परिणामी, मद्रास प्रांताने १९२१ मध्ये भारतात प्रथमच महिलांना मतदानाचा अधिकार बहाल केला. १९२६ पर्यंत सर्वच प्रांतात महिलांना हक्क देण्यात आला. भारतात महिलांना निवडणूक लढवण्याचाही अधिकार देण्यात आला. भारतात महिलांना निवडणूक लढवण्याचीही अनुमती मिळाली. निवडणुकीस उभा राहिलेल्या कमलादेवी आणि अँजेलो या दोन्ही उमेदवारांचा पराभव झाला. यानंतर महिलांना नामनिर्देशित सदस्य म्हणून स्वीकारण्यात यावे, असा आग्रह धरण्यात आला. मद्रास प्रांताने यास सकारात्मक प्रतिसाद देत मुथूलक्ष्मी रेड्डी यांना विधिमंडळात नियुक्त केले. त्या भारतातील पहिल्या विधिमंडळाच्या अध्यक्षा बनल्या.

इंग्लंडमध्ये महिलांना १८६५ पासून लढा द्यावा लागला. अनेकजण मृत्युमुखी पडल्या. अनेक महिला आणि समर्थक पुरुष अपंग झाले. त्यानंतर १९२८ साली मताधिकार मिळाला. याउलट भारतात फारसे आंदोलन न करता महिलांना मताधिकार मिळाला. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात स्त्री-पुरुष समानतेचे सूत्र लावले. त्यामुळे महिलांना वैधानिकदृष्ट्या पुरुषांच्या बरोबरीने संपूर्ण अधिकार प्राप्त झाले. १९४७ साली भारत स्वतंत्र होतानाच महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. मात्र हे साध्य होण्यासाठी येथे वैचारिक मशागत अनेक वर्षांपासून झाली होती. महात्मा जोतिराव फुले यांनी स्त्री-शिक्षणाचा घेतलेला वसा स्त्रियांचा वैचारिक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी महत्त्वपूर्ण होता. त्याचबरोबर मद्रास, बडोदा, कोल्हापूर भागात सामाजिक सुधारणेचे आणि त्यातही महिलांना समानतेची वागणूक, सन्मान देण्याचे कार्य जोरात झाले. राजर्षी शाहू महाराज, महाराजा सयाजीराव यांनी आपल्या राज्यात स्त्री-शिक्षण सुरू करण्यात मोठे कार्य केले. शिक्षण घेणाऱ्या महिलांना मान आणि सन्मान मिळत होता. १९५० नंतर तर संविधानाने महिलांना समान हक्क दिले. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना काही जागा राखीव ठेवण्यात आल्या; मात्र आजही महिला निवडून येतात. संवैधानिक पदावर निवडल्या जातात; मात्र बहुतांश वेळा आमदार आणि खासदार पदावरील महिलांचा अपवाद वगळता सरपंचपदासारख्या महत्त्वाच्या पदावरील महिलांचे पतीच राज करतात. त्यामुळे महिलांना मताधिकार आणि निवडणूक लढवण्याचे स्वातंत्र्य याचा त्यांनी खऱ्या अर्थाने फायदा घ्यायला हवा. तरच खऱ्या अर्थाने मतोत्सवातील महिलांचा सहभाग सार्थकी लागेल.

◆◆

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2024
लोकमत

# 'मराठी भाषेचा उत्कर्ष युवा पिढीच्या हाती'

कोल्हापूर : मराठीला अधिक समृद्ध करण्यासाठी जास्तीत जास्त नवीन शब्दांचा वापर करा. भाषेचा अभिमान बाळगण्याबरोबरच आपण भाषेसाठी काही तरी देणे लागतो, याचा विचारही तरुण पिढीने करावा, तेव्हा मराठी भाषेला समृद्धता येईल, असा विश्वास प्रा. डॉ. राजा दीक्षित यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. डॉ. दीक्षित यांनी 'मराठी लढ्याचे शतक' या विषयाची मांडणी करताना मराठी भाषेच्या विकासाचे आणि समृद्धीचे एकूण पाच टप्पे सांगितले. डॉ. दीक्षित म्हणाले की, हे मराठी भाषेचे पाच कालखंड आणि मराठी भाषेचे जैविक नाते आहे. मराठी संतांनी मराठी भाषेला खूप मोठी श्रीमंती दिली. मराठा काळ हा मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीने भरभराटीचा ठरतो. यावेळी प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी परिचय करून दिला. यावेळी प्रा. डॉ. अरुण भोसले, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, किशोर बेडकिहाळ, प्राचार्य विलास पोवार, इस्माईल पठाण, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर उपस्थित होते. डॉ. उमाकांत हत्तीकट यांनी आभार मानले

जनसंपर्क कक्ष
16 FEB 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबई आणि शिवाजी विद्यापीठाला आज राष्ट्रीय युवा संसद पारितोषिक वितरण

**नवी दिल्ली :** विद्यापीठे-महाविद्यालयांसाठी आयोजित राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेतील २०१९-२० वर्षासाठीच्या विजेत्यांना शुक्रवारी पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार असून, या वेळी गटस्तरावर विजेते ठरलेले मुंबई विद्यापीठ आणि कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठही सन्मानित होणार आहे.

नवी दिल्लीत पार्लमेंट लायब्ररी इमारतीमधील जीएमसी बालयोगी सभागृहात येथे हा कार्यक्रम होणार आहे. केंद्रीय विधि आणि न्याय राज्यमंत्री, संसदीय व्यवहार राज्यमंत्री आणि संस्कृती राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. या स्पर्धेत यशस्वी विद्यार्थी आणि संस्थांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. संसदीय व्यवहार मंत्रालयातर्फे गेल्या २७ वर्षांपासून विद्यापीठे आणि महाविद्यालयासाठी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचे आयोजन करत आहे. या अंतर्गत १६व्या स्पर्धेचे देशातील ३६ विद्यापीठांमध्ये आयोजन करण्यात आले होते. युवा पिढीमध्ये लोकशाही मूल्यांबरोबरच संसदीय कामकाजाच्या प्रक्रिया आणि पद्धतींविषयी माहिती आणि प्रगल्भता निर्माण करणे, हे या स्पर्धांचे उद्दिष्ट आहे. भटिंडा येथील पंजाबच्या केंद्रीय विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला असून, गट स्तरावर मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), जादवपूर विद्यापीठ (कोलकाता) आणि चाणक्य राष्ट्रीय विधी विद्यापीठ (पाटणा) हे अव्वल ठरले आहे.

16 FEB 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## समक्ष मुलाखत (Walk in Interview)

### जाहिरात क्र.०२/२०२४

शिवाजी विद्यापीठ कार्यालयात 11 महिन्याच्या हंगामी कालावधीकरिता खालील पदे (रोजंदारी/एकत्रीत मानधनावरील) भरण्यासाठी उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येणार आहे तेव्हा पात्र उमेदवारांनी मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे अर्ज करून अर्जासह व आपल्या मूळ कागदपत्रांसह व झेरॉक्सप्रतींसह खाली नमूद केलेल्या दिनांकास समक्ष मुलाखतीसाठी स्वखर्चाने सकाळी 10.00 वाजता उपस्थित रहावे.

| अ.क्र | पद | शैक्षणिक पात्रता | वेतन |
|---|---|---|---|
| | | **दि.28.02.2024** | |
| 1 | कौशल्य विकास अधिकारी पदसंख्या – 01 | Good Academic record with 55% Marks at PG level and minimum 2 (two) years experience skill may be considered. Computer knowledge – MS Office, Power point, social Media users preferred Fluent in English Communication and soft skills **(For more detail refer our 'www.unishivaji.ac.in' wibsite)** | एकत्रित मानधन दरमहा रु.21600/– |
| 2 | अस्थायी कनिष्ठ अभियंता (विद्युत) | B.E. (Electrical) with three years actual experience in HT & LT Installation or Diploma in Electrical Engg. from M.S.B.T.E. with 05 years actual construction experience in HT & LT Installation | एकत्रित मानधन दरमहा रु.15000/– |
| 3 | फायर सेफ्टी ऑफीसर पदसंख्या – 01 | Diploma in Fire Safety | एकत्रीत मानधन रु.15000/– दरमहा |
| 4 | रोजंदारी **सुरक्षा रक्षक** | Ex-serviceman or persons belonging to Para-military force, Home-guards/SRP **(Ex-serviceman will be preferred)** | प्रतीदिन रु.495/– |
| 5 | रोजंदारी तारतंत्री | आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण | प्रतीदिन रु.450/– |
| 6 | रोजंदारी पंप ऑपरेटर | आय.टी.आय पंपचालक प्रमाणपत्रधारक/संबंधित क्षेत्रातील 1 वर्षाचा अनुभव | प्रतीदिन रु.450/– |
| 7 | रोजंदारी दुरुध्वनी चालक सहायक पदसंख्या – 02 | पदवीधर व दूरध्वनी चालक कोर्स उत्तीर्ण | प्रतीदिन रु.450/– |
| 8 | रोजंदारी **ग्रंथालय सहायक** | Essential – 1) Any Graduate 2) Pass out M.Lib. & Inf. Sci. Course Desirable – 1) Fair Computer Knowledge (MS-CIT/Certificate/Diploma in Computer) 2) Two years of work experience in academic library | प्रतीदिन रु.400/– |
| | | **दि.29.02.2024** | |
| 9 | रोजंदारी हॉर्टिकल्चर सुपरवायझर – पद 01 | बी.एस्सी. (कृषी/हॉर्टी) पदवीधर, किमान 02 वर्षे कोणत्याही शासकीय क्षेत्रात/स्थानिक स्वराज्य संस्था/सहकारी संस्था/स्वायत्त मंडळ/खाजगी क्षेत्रात या कामाचा अनुभव | प्रतीदिन रु.750/– |
| 10 | रोजंदारी **कनिष्ठ लेखनिक** | पदवीधर व संगणकाचे ज्ञान आवश्यक **(शासनमान्य इंग्रजी व मराठी टंकलेखनाचे ज्ञान आवश्यक)** | प्रतीदिन रु.400/– |
| 11 | रोजंदारी महिला नाईट वॉर्डन | किमान 12 वी उत्तीर्ण, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी असल्यास प्राधान्य तसेच चांगल्या वर्तणुकीचा दाखला आवश्यक | प्रतीदिन रु.400/– |
| 12 | रोजंदारी पुरुष नाईट वॉर्डन | किमान 12 वी उत्तीर्ण, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी असल्यास प्राधान्य तसेच चांगल्या वर्तणुकीचा दाखला आवश्यक | प्रतीदिन रु.400/– |
| 13 | रोजंदारी वाहनचालक | किमान 8 वी उत्तीर्ण, जड व हलके वाहन चालविण्याचा परवाना व अनुभव आवश्यक | प्रतीदिन रु.450/– |
| 14 | रोजंदारी ट्रॅक्टर चालक | किमान 8 वी उत्तीर्ण ट्रॅक्टर व ट्रॉली चालविण्याचा परवाना आवश्यक | प्रतीदिन रु.450/– |
| | | **दि.01.03.2024** | |
| 15 | अस्थायी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | B.E. (Civil) with three years actual construction experience or Diploma in Civil Engg. from M.S.B.T.E. with 05 years actual construction experience | एकत्रित मानधन दरमहा रु.15000/– |
| 16 | रोजंदारी **प्रयोगशाळा सहायक** | • Any Diploma from M.S.B.T.E. or B.Sc. • संगणक ज्ञान आवश्यक | प्रतीदिन रु.400/– |
| 17 | रोजंदारी **कुली** | 7 वी पास, स्वच्छक कामाचा अनुभव अथवा तयारी असल्यास प्राधान्य | प्रतीदिन रु.400/– |
| 18 | रोजंदारी **शिपाई** | 7 वी पास | प्रतीदिन रु.350/– |
| 19 | रोजंदारी सुतार | आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण किंवा सुतार कामाचा 1 वर्षे अनुभव | प्रतीदिन रु.450/– |
| 20 | रोजंदारी नळ कारागीर | आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण किंवा नळ कारागीर कामाचा 1 वर्षे अनुभव | प्रतीदिन रु.450/– |
| 21 | रोजंदारी गवंडी | आय.टी.आय बिल्डींग कन्स्ट्रक्शन कोर्स उत्तीर्ण किंवा गवंडी कामाचा 1 वर्षे अनुभव | प्रतीदिन रु.450/– |
| 22 | रोजंदारी अस्थायी आया/शिपाई (पाळणाघरसाठी) | आरोग्य सहाय्यक कोर्स पूर्ण करणाऱ्यांना अथवा मान्यताप्राप्त रूग्णालयातील आया/शिपाई अथवा तत्सम पदाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य | प्रतीदिन रु.350/– |

1. **वयोमर्यादा :– उपरोक्त अ.क.4 सुरक्षा रक्षक पदासाठी** उमेदवाराची किमान वयोमर्यादा **25** वर्षे व कमाल **58** वर्षे राहील. **अ.क.10 व 11 नाईट वॉर्डन पदाकरीता** किमान वयोमर्यादा **40** वर्षे व कमाल वयोमर्यादा **65** वर्षे राहील. उर्वरीत सर्व पदांकरिता खुल्या वर्गातील उमेदवारांसाठी किमान **18** वर्षे व कमाल **38** वर्षे वयोमर्यादा राहील व राखीव उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा **43** वर्षे राहील. सदर किमान व कमाल वयोमर्यादा मुलाखती दिवशी सापेक्ष समजण्यात येईल.
2. उपरोक्त सर्व पदे ११ महिन्याकरिता हंगामी पध्दतीने तात्पुरत्या कालावधीकरिता भरावयाची असल्यामुळे, या पदांसाठी कायमस्वरूपी पदाप्रमाणे कोणतेही फायदे मिळणार नाहीत. तसेच सदर पदावर काम केल्यामुळे विद्यापीठाच्या नियमित सेवेतील कोणत्याही पदावर हक्क संबंध अथवा अधिकार रहाणार नाही.
3. उपरोक्त समक्ष मुलाखतीअंती निवड झालेल्या उमेदवारांना, संबंधीत पदावरील सध्या विद्यापीठाकडील उपलब्ध प्रतिक्षा यादी संपलेनंतरच आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देणेत येतील. याची नोंद घ्यावी.
4. सदर पदासाठीचे अर्ज मुलाखती दिवशी सकाळी 11.00 वाजेपर्यंतच स्वीकारले जातील. त्यानंतर येणा–या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**मुलाखतीचे ठिकाण:– मुख्य प्रशासकीय इमारत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

शिवाजीवि/आस्थापना
दिनांक:– 16.02.2024

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव